नागपूर विभागातील गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, व नागपूर, जिल्ह्यांमध्ये सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम घेणेबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्र. विहीर-२०१६/प्र.क्र. ३१/रोहयो-५**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ११ सप्टेंबर, २०१६

**प्रस्तावना :**

अनियमित, अपु-या पावसामुळे गेल्या काही वर्षात राज्यात सातत्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण होत आहे. दुष्काळी स्थितीमुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होत आहे. शासनाकडून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तात्पुरत्या स्वरूपात मदत व पुनर्वसन विभागाकडून मोठ्या प्रमाणात मदत करण्यात येत आहे. यावर शाश्वत व कायमस्वरुपी उपाययोजना करणेची आवश्यकता आहे.

मा. मुख्यमंत्री महोदयांनी दुष्काळावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत विधान मंडळाच्या सन २०१५ च्या हिवाळी अधिवेशनात घोषणा केली असून टंचाई परिस्थितीवर कायमस्वरूपी उपाय योजना करण्याकरिता शाश्वत सिंचनाची व तत्सम इतर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडून रू. २००० कोटी इतकी रक्कम उपलब्ध करून देण्यात येईल, असे सभागृहात जाहिर केले होते. त्यास अनुसरून मा. वित्त मंत्री महोदयांनी सन २०१६ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये रू. २००० कोटी इतक्या निधीची तरतूद करण्याची घोषणा केलेली असून, त्यानुसार सन २०१६-१७ या वर्षाच्या महसूल व वन विभागाच्या ( मदत व पुनर्वसन ) अर्थसंकल्पात मागणी क्रमांक-सी-९, ४२५०, इतर सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च, या योजनेत्तर योजना खाली रू. २००० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आलेली आहे.

सन २०१५ च्या हिवाळी अधिवेशनाच्या कालावधीत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली विधानभवन, नागपूर येथे विदर्भातील ११ जिल्हयांच्या आढावा बैठका घेण्यात आल्या होत्या. सदर बैठकांच्या इतिवृत्तांवर केलेल्या कार्यवाही बाबतचा आढावा दिनांक ४ एप्रिल, २०१६ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांनी व्हिडीयो कॉन्फरन्सद्वारे घेतला आहे. त्यावेळी नागपूर विभागातील गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदीया, व नागपूर या जिल्ह्यात भूगर्भात पाण्याची अधिक उपलब्धता असूनही विहिरींची संख्या कमी असल्याने सिंचनाची सुविधा कमी प्रमाणात उपलब्ध आहे. उपलब्ध पाण्याची पातळी विचारात घेता या ठिकाणी शेततळी घेण्यापेक्षा जास्तीत जास्त प्रमाणात विहिरी घेण्यात याव्यात, असे जिल्हाधिकारी गडचिरोली यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांचे निदर्शनास आणले होते. त्यास अनुसरुन या जिल्ह्यांमध्ये सिंचन विहीरींचा कार्यक्रम घेण्याचे तसेच सदर कार्यक्रमासाठी लागणारा निधी योजनेत्तर -“Drought Mitigation Measures”अंतर्गत मदत व पुनर्वसन विभागामार्फत उपलब्ध करून देण्याचे निदेश मा. मुख्यमंत्री महोदयांनी आढावा बैठकीत दिले आहेत.

त्यानुसार मदत व पुनर्वसन विभागामार्फत सन २०१६-१७ या वर्षासाठी **"विहिरी तयार करणे"** यासाठी रु. ७५० कोटीची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. विहिरी तयार करण्यासाठी असलेली तरतूद विचारात घेऊन नागपूर विभागातील गडचिरोली - ४५०० विहिरी, भंडारा-१००० विहिरी, चंद्रपूर-३०००, विहिरी, गोंदीया-२००० विहिरी, व नागपूर -५०० विहिरी अशाप्रकारे पाच जिल्ह्यासाठी एकूण ११००० विहिरींचा लक्षांक देण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती. त्यास अनुसरुन शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

**<u>शासन निर्णय:-</u>**

(१) नागपूर विभागातील गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदीया व नागपूर या पाच जिल्ह्यांसाठी विभागीय आयुक्त, नागपूर यांनी प्रस्तावित केल्यानुसार गडचिरोली - ४५०० विहिरी, भंडारा-१००० विहिरी, चंद्रपूर-३००० विहिरी, गोंदीया-२००० विहिरी व नागपूर - ५०० विहिरी अशाप्रकारे पाच जिल्ह्यासाठी एकूण ११००० सिंचन विहिरींचा कार्यक्रम घेण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**(१) <u>नागपूर विभागातील गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया व नागपूर या ५ जिल्ह्यांसाठी ११,००० सिंचन विहिरींचा कार्यक्रमाबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-</u>**

**(१.१) <u>लाभार्थी निवडीचे निकष:-</u>**

सिंचन विहिरीं कार्यक्रम अंतर्गत लाभार्थी निवडीचे निकष खालीलप्रमाणे:

सिंचन विहीर कार्यक्रमासाठी अर्ज करणा-या लाभार्थ्यांनी खालील अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

(१) शेतक-याकडे त्याच्या नावावर कमीतकमी ०.६० हेक्टर जमीन असावी. यात कमाल मर्यादा नाही.

(२) लाभार्थी शेतक-याची जमीन विहीरीसाठी तांत्रिकदृष्ट्या पात्र असणे आवश्यक राहील. (यासंदर्भात शाखा अभियंता / उप अभियंता यांनी भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेचे अधिकारी / कर्मचारी यांच्यासोबत जागेची पाहणी करून त्यांचा अहवाल घेण्यात यावा.)

(३) यापूर्वी अर्जदाराने विहीर, शेततळे, सामुदायिक शेततळे अथवा भात खाचरासोबत तयार होणारी बोडी या घटकांचा शासकीय योजनांमधून लाभ घेतलेला नसावा.

लाभार्थ्याकडे किमान ०.६० हेक्टर जमीन असावयास हवी, त्याहून कमी क्षेत्र असलेल्या लाभार्थ्यास विहीर मंजूर करु नये. मात्र दोन अथवा तीन लाभार्थ्यांनी त्यांची जमीन सलग असल्यास सामुदायिक विहीरीची मागणी केली तर ते सामुदायिकरित्या विहीर मिळण्यास पात्र असतील. यासंदर्भात

पाण्याचा वापर व पाण्याची हिस्सेवारी याबाबत संबंधित शेतकऱ्यांनी रु १०० च्या स्टँम्प पेपर वर करार करावा.

**लाभार्थी निवड खालील प्राथमिकतेनुसार करावी.**

१) ज्या कुटूंबा मध्ये आत्महत्या झालेली आहे त्यांचे वारसदार

२) दारिद्र्यरेषेखालील (BPL) शेतकरी

३) इतर लाभार्थी

**(१.२) <u>विहीरींसाठी लक्षांक :-</u>**

सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत विभागीय आयुक्त, नागपूर यांनी प्रस्तावित केल्यानुसार खालीलप्रमाणे विहीरींचा लक्षांक देण्यात येत आहे.

| **जिल्हा** | **लक्षांक** |
|---|---|
| गडचिरोली | ४५०० विहिरी |
| भंडारा | १००० विहिरी |
| चंद्रपूर | ३००० विहिरी |
| गोंदीया | २००० विहिरी |
| नागपूर | ५०० विहिरी |
| **एकूण** | **११००० विहिरी** |

सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत देण्यात आलेल्या उपरोक्त लक्षांकास अनुसरुन तालुक्यांचा लक्षांक, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मागणीनुसार निश्चित करावा.

**(१.३) <u>विहीर योजनेची अंमलबजावणी, प्रसार, प्रसिध्दी व संनियंत्रण:-</u>**

सिंचन विहीर कार्यक्रमास क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी प्रसिध्दी द्यावी. जिल्हाधिकारी कार्यालये, तहसिल कार्यालये, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायत कार्यालयात नोटीस बोर्डवर प्रसिध्दी देण्यात यावी. या व्यतिरीक्त योजनेच्या प्रसारासाठी जाहिरात प्रसिध्द करणे बंधनकारक असून, सदर जाहिरात जिल्हा माहिती अधिका-यामार्फत सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयाप्रमाणे आवश्यक त्या तीन मोठया प्रमाणावर खप असलेल्या स्थानिक वर्तमानपत्रामधून देण्यात यावी. जाहिरात वेबसाईटवर सुध्दा प्रसिध्द

करावी. अशा विविध स्तरावरुन प्रचार करावा. इच्छुक लाभार्थींना ठराविक मुदतीत अर्ज करण्यासाठी आवाहन करण्यात यावे.

सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत विहिरींकरिता वितरीत करण्यात येणाऱ्या एकूण निधीच्या ४ टक्के रक्कम आस्थापना खर्चासाठी देय राहील. त्याची विभागणी १ टक्का रक्कम राज्यस्तरावर, ३ टक्के रक्कम विभागीय आयुक्त / जिल्हा / क्षेत्रीय स्तरावरील खर्चासाठी राखून ठेवण्यात येत आहे. जिल्हा / क्षेत्रीयस्तरावर अधिकची रक्कम मंजूर विहिरींच्या प्रमाणात तालुक्यांना उपलब्ध करुन द्यावी.

सदर विहिरींच्या कार्यक्रमाकरिता आवश्यकतेनुसार सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना निव्वळ कंत्राटी स्वरुपात, डाटा एन्ट्री ऑपरेटर, एमआयएस को-ऑर्डीनेटर, लिपिक-टंकलेखक व वर्ग-४ चा कर्मचारी (कमाल ४ कर्मचारी) या पदांसाठी जिल्हास्तरावर नियुक्त करण्यात यावे. कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन तसेच त्रयस्थ संस्थेमार्फत भौतिक तपासणी यावर होणारा खर्च, स्टेशनरी इत्यादी वरील होणारा खर्च, आस्थापना खर्चासाठी राखून ठेवण्यात आलेल्या रक्कमेतून भागविण्यात यावा. शासन स्तरावर स्टेशनरी, पुस्तक छपाई, झेरॉक्स व प्रिंटर मशिन यावर होणारा खर्च राज्यस्तरीय खर्चासाठी राखून ठेवलेल्या १ टक्का रक्कमेतून करण्यात यावा. राज्यस्तरावरील १ टक्का खर्चाची रक्कम विभागीय आयुक्त स्तरावर आहरीत करण्यात यावी व त्याचा स्वतंत्र हिशोब ठेवण्यात यावा. विभागीय आयुक्त हे या योजनेचे Online Monitoring करिता समन्वय अधिकारी असल्याने, महाऑनलाईन, MRSAC, एनआयसी इत्यादी संस्थांसोबत आवश्यकतेनुसार कामकाज करतील. त्याकरिता शासन आदेश निर्गमित झाल्यापासून विभागीय आयुक्त कार्यालयातील उपआयुक्त (रोहयो), कार्यकारी अभियंता, (विभागिय आयुक्त कार्यालय, रोहयो शाखा), नागपूर यांचेकडे संनियंत्रण कक्ष १५ दिवसात सुरु करण्यात यावा.

महा ऑनलाईन व MRSAC यांचेशी संपर्काकरीता विभागीय आयुक्त यांनी उपआयुक्त (रोहयो) यांचे सोबत कार्यकारी अभियंता (रोहयो शाखा) यांना आवश्यकतेनुसार मुंबई येथे बैठकींना उपस्थित राहण्याबाबत सूचना द्याव्यात. रोहयो शाखेतील अधिक्षक कृषि अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी व लेखाधिकारी यांची उपायुक्त (रोहयो) व कार्यकारी अभियंता यांचे समवेत प्रत्येकी एका जिल्ह्याकरीता समन्वयक म्हणून नेमणुक करावी.

**(१.४) लाभार्थ्यांकडून अर्ज मागविणे (अर्जाची उपलब्धता व ऑनलाईन नोंदणी)**

इच्छूक शेतकऱ्यांचे विहित नमुन्यातील अर्ज तथा संमती या कार्यक्रमासाठी अनिवार्य आहे. शेतकऱ्यांनी त्यांची विहिरीची मागणी ऑनलाईन द्वारे संगणकिय प्रणालीद्वारे भरावयाची आहे. यासाठी करावयाचे अर्ज

http://aaplesarkar.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहेत. वेबसाईट वरून अर्जाचा नमुना इच्छूक शेतकऱ्यांनी डाऊनलोड करून घ्यावा. प्रपत्र २ मध्ये नमूद केलेली माहिती जमा करून मुळ अर्ज भरून लाभार्थ्यांनी स्वत:च्या स्वाक्षरीसह सर्व कागदपत्रे Scan करून ठेवावे. ऑनलाईन पध्दतीने http://aaplesarkar.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अर्जातील माहिती ऑनलाईन भरून अर्जात नमूद केलेली जोडपत्रे Scan Copy जोडून अपलोड करावी. ऑनलाईन अर्जाची पोचपावती लाभार्थ्यांनी डाऊनलोड करून स्वत:कडे ठेवावी. ऑनलाईन अर्ज अपलोड करण्याची प्रक्रिया http://aaplesarkar.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध राहिल.

या योजनेत अर्ज करणाऱ्या व्यक्तिने "आपले सरकार" संकेतस्थळावर जाऊन विहीर कार्यक्रम या लिंकवर क्लिक करावे. त्यानंतर अर्जदारास खालील ३ पर्याय उपलब्ध राहतील.

१. आपले सरकार संकेत स्थळावर यापूर्वी तयार केलेल्या प्रोफाईलचा वापर करणे.

२. आपले सरकार पोर्टल वर नव्याने प्रोफाईल तयार करून (वरील १ नुसार प्रोफाईल उपलब्ध नसल्यास).

३. कोणत्याही महा-ई सेवा केंद्रामार्फत (CSC मध्ये).

प्रथम उपरोक्त (१) व (२) मधील पर्यायांकरिता स्वत:चा मोबाईल क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच (१) व (२) बाबत अर्जदार स्वत: अथवा सायबर कॅफेतून संगणकाचा वापर करून अर्ज भरू शकतो. अर्जासाठी सेवा शुल्क रु. २०/- अधिक सेवा कर लागू राहिल.

उपरोक्त (३) बाबत अर्जदाराकडे मोबाईल क्रमांक नसल्यास महा-ई सेवा केंद्राकडून अर्ज भरत असताना वरील बाबींसाठी (Scanning, Uploading इत्यादी) प्रक्रिया महा-ई सेवा केंद्र चालकाचे मार्फत करावी.

**(१.५) <u>विहिरीची जागा निवडीचे निकष :-</u>**

लाभार्थ्यास विहीर मंजूर झाल्यावर खालील निकषानुसार विहीरीची जागा निश्चित करण्यात यावी.

१) भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेने पाणवहाळ म्हणून जाहीर केलेले क्षेत्र,

२) भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी पाण्याची उपलब्धता व पाणी पातळी चांगली असून तेथे Water Surplus Area आहे, याबाबत जागेची खात्री केल्यावर त्या ठिकाणी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचा दाखला घेऊन विहीरी घेण्यात याव्यात.

(१.६) <u>लाभार्थी निवड समिती:-</u>

नागपूर विभागातील गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, व नागपूर या जिल्ह्यांमध्ये सिंचन विहीर या कार्यक्रमासाठी पात्र लाभार्थींची निवड करतांना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सिंचन विहीर कार्यक्रमा अंतर्गत लाभार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर केल्यावर दर पंधरा दिवसांनी प्राप्त होणारे अर्ज एकत्र करुन त्यांची छाननी करुन पुढील प्राथम्यक्रमा नुसार यादी तयार करावी.

**प्राथम्यक्रम** - १. आत्महत्याग्रस्त कुटूंबाचे वारसदार. (२) बीपीएल धारक शेतकरी, (३) इतर सर्व लाभार्थी. सदर यादी तयार करून, लाभार्थी निवडीसाठी जिल्हास्तरीय समिती समोर सादर करावी. या सर्व कामांसाठी खालील प्रमाणे तालुकास्तरावर समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | उपविभागीय अधिकारी | अध्यक्ष |
| २) | गट विकास अधिकारी | सह अध्यक्ष |
| ३) | तहसिलदार | सदस्य |
| ४) | संबंधित तालुक्याचे कनिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा | सदस्य |
| ५) | उप अभियंता (लघुपाटबंधारे), पाणी पुरवठा, जिल्हा परिषद उपविभाग | सदस्य सचिव |

सिंचन विहीर योजनेची अंमलबजावणी, तालुका निहाय लक्षांक निश्चित करणे, तालुकास्तरीय समितीने सादर केलेल्या पात्र लाभार्थ्यांच्या यादी मधून प्राथम्यक्रमानुसार लाभार्थ्यांची निवड करणे, यासाठी जिल्हास्तरावर खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सहअध्यक्ष |
| ३) | अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | सदस्य |
| ४) | उपजिल्हाधिकारी (रोहयो) | सदस्य |
| ५) | उप मुख्यकार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) / नरेगा | सदस्य |
| ६) | वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा | सदस्य |
| ७) | महाआॅनलाईन प्रतिनीधी | सदस्य |
| ८) | MRSAC प्रतिनीधी | सदस्य |
| ९) | कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (लघुपाटबंधारे) | सदस्य सचिव |

सिंचन विहीर कार्यक्रमाची अंमलबजावणी प्रभावीपणे होत आहे. किंवा नाही याबाबत योजनेचा आढावा घेणे व संनियंत्रण करणे यासाठी विभागीय स्तरावर खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | विभागीय आयुक्त | अध्यक्ष |
| २) | विभागीय उपसंचालक (भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा ) | सदस्य |
| ३) | मुख्य अभियंता/अधिक्षक अभियंता स्थानिकस्तर, लघुपाटबंधारे सिंचन, नागपूर | सदस्य |
| ४) | उपआयुक्त, (रोहयो) | सदस्य |
| ५) | उपआयुक्त, (विकास) | सदस्य |
| ६) | MRSAC संचालक अथवा त्यांचे प्रतिनीधी | सदस्य |
| ७) | महा ऑनलाईन प्रतिनीधी | सदस्य |
| ८) | कार्यकारी अभियंता, (रोहयो) विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर | सदस्य सचिव |

सदर योजना जिल्हास्तरावर प्रभावी पणे राबविण्यासाठी योजनेचा आढावा व समन्वयासाठी जिल्हा स्तरावर मा. पालक मंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | संबंधित जिल्ह्याचे पालक मंत्री | अध्यक्ष |
| २) | जिल्ह्यातील विधानसभा / विधान परिषद सदस्य | सदस्य |
| ३) | जिल्हाधिकारी | सदस्य |
| ४) | मुख्य कार्यकारी अधिकारी | सदस्य |
| ५) | वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा | सदस्य |
| ६) | कार्यकारी अभियंता, (लपा/छोपावी) जिल्हा परिषद कार्यालय | सदस्य सचिव |

सिंचन विहीर कार्यक्रमासंदर्भात करावयाच्या कार्यवाहीचे वेळापत्रक स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येईल.

(१.७) <u>लाभार्थी निवडीची पध्दती :-</u>

या कार्यक्रमा अंतर्गत लाभ घेणा-या ईच्छूक लाभार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने दिलेल्या संकेत स्थळावर सर्व आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत. सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर तालुकास्तरीय समितीने दर १५ दिवसांनी प्राप्त होणा-या अर्जांची छाननी करुन पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करावी. पात्र लाभार्थ्यांचे अर्ज सदर यादीसह जिल्हास्तरीय समितीकडे सादर करावेत. जिल्हास्तरीय समितीने प्राथम्यक्रमानुसार लाभार्थ्यांची निवड करावी. लक्षांकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास लक्षांका एवढ्या लाभार्थ्यांची निवड करुन उर्वरीत पात्र लाभार्थ्यांची प्रतिक्षीयादी तयार करावी.

**<u>या योजनेसाठी निवड झालेल्या लाभार्थ्यांबाबत करावयाची कार्यवाही:-</u>**

जिल्हास्तरीय समितीने लाभार्थ्यांची निवड केल्याचे संबंधित गट विकास अधिका-यास कळवावे.

तांत्रिक मान्यता संबंधित उपअभियंता जिल्हापरिषद यांनी तर प्रशासकीय मान्यता संबंधित गट विकास अधिकारी यांनी द्यावी. प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यावर कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद यांनी लाभार्थ्यांना तात्काळ कार्यारंभ आदेश द्यावेत. कार्यारंभ आदेश दिल्यानंतर लाभार्थ्यांनी ३० दिवसात विहिरीचे काम सुरु करावे व पुढील ६ महिन्यात काम पुर्ण करावे. विहिरीचे काम पूर्ण झाल्यावर लाभार्थ्यांसह विहिरीचा फोटो GPS image द्वारे वेबसाईटवर Upload करणे अनिवार्य आहे.

(१.८) **<u>तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी :-</u>**

या योजने अंतर्गत संबंधित जिलापरिषदेचे उपअभियंता यांनी तांत्रिक मान्यता द्यावी. तसेच प्रशासकीय मान्यता संबंधित गट विकास अधिकारी यांनी द्यावी. ज्या लाभार्थ्यांची अंतिम निवड झाली आहे, त्यांचे गावनिहाय व गटनिहाय प्रकल्प प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाच्या उप अभियंता यांचे मार्फत त्यांच्या तांत्रिक कर्मचा-यांच्या मदतीने गट विकास अधिकारी यांनी तयार करुन घ्यावेत. प्रस्तूत प्रकल्प प्रस्ताव संबंधित तांत्रिक अधिकारी यांनी तयार केलेल्या मॉडेल आराखडा व अंदाजपत्रकानुसार असावेत.

(१.९) **<u>लाभार्थ्यांची जबाबदारी :-</u>**

१) भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांनी निश्चित केलेल्या जागेवर विहीर घेणे बंधनकाराक राहील.

२) कार्यारंभ आदेश मिळाल्यापासून लाभार्थ्यांनी विहीरीचे काम ३० दिवसात सुरु करावे व पुढील ६ महिन्यात पूर्ण करावे.

३) लाभार्थीने स्वत:चा राष्ट्रीयकृत बँक / इतर बँके मधील खाते क्रमांक संबंधित गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचेकडे पासबुकाच्या झेरॉक्ससह सादर करावा.

४) विहीरीची निगा व दुरूस्तीची जबाबदारी संबंधीत लाभधारकांची राहील.

५) लाभार्थ्यांच्या ७/१२ चे उता-यावर विहीरीची नोंद काम पूर्ण झाल्यावर घेणे बंधनकारक राहील.

६) विहीर पूर्ण झाल्यावर विहीरीच्या योजनेचा बोर्ड लाभार्थ्याने स्वखर्चाने लावणे बंधनकारक आहे.

७) नैसर्गिक आपत्तीमुळे विहीरीस कोणत्याही प्रकारची हानी पोहोचल्यास नुकसान भरपाई अनुज्ञेय राहणार नाही.

८) विहीरीचे बांधकाम लाभार्थ्याने स्वत: / मजुराद्वारे / अन्य पर्यायी साधनांच्या ( जेसीबी / पोकलेन सारख्या मशिन्स) सहाय्याने पूर्ण करावे. या करीता मशीन उपलब्ध करून घ्याववयाची जबाबदारी संबंधित लाभार्थ्याची राहिल.

९) मंजूर आकारमान (Type Plan) नुसार विहीर खोदणे लाभार्थ्यास बंधनकारक राहिल.

(१.१०) <u>निधी :-</u>

सिंचन विहीरी कार्यक्रमासाठी लागणारा निधी, "४२५०, इतर सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च, अंतर्गत (००) (०२) दुष्काळ प्रतिबंधक उपाययोजना या अंतर्गत विहीरी तयार करणे (४२५० ए ०१६), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर), या लेखाशिर्षाखाली मदत व पुनर्वसन विभागाने सन २०१६-१७ वर्षासाठी अर्थसंकल्पित केलेल्या निधीमधून उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर निधी योजनेत्तर (Non-plan) मधून उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

सदर निधी रोहयो विभागास मदत व पुनर्वसन विभागाकडून उपलब्ध करुन देण्यात येईल. तदनंतर हा निधी विभागीय आयुक्त नागपूर यांना वितरीत करण्यात येईल. विभागीय आयुक्त, नागपूर यांनी सदर निधी आवश्यकतेनुसार जिलाहधिका-यांमार्फत जिल्हापरिषदांना उपलब्ध करुन द्यावा. **सदर कार्यक्रमासाठी निधी वितरणासाठी विभागीय आयुकात नागपूर यांना यांना -नियंत्रक अधिकारी॰ म्हणून घोषित करण्यात येत आहे.** त्यांनी वितरीत केलेल्या निधीची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधित जिलाहधिका-यांनी महालेखाकार कार्यालयास सादर करावीत. तसेच झालेल्या खर्चाचा ताळमेळ घेण्यात यावा व त्याबाबतचे प्रमाणपत्र शासनास सादर करावे. पुढील निधीची मागणी शासनाकडे करावी. या कार्यक्रमा अंतर्गतच्या सर्व जिल्ह्यांकडून उपयोगीता प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेणे, तसेच खर्चाचा ताळमेळ, याबाबतचा आढावा घेणे / नियंत्रण ठेवणे याबाबतची जबाबदारी विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त (रोहयो), कार्यकारी अभियंता व लेखाधिकारी यांचेकडे संयुक्तीकरित्या देण्यात येत आहे. उपायुक्त (रोहयो) यांनी प्रत्येक आठवड्याच्या शुक्रवारी भौतिक व आर्थिक अहवाल शासनास विभागीय आयुक्त यांचे स्वाक्षरीने सादर करावा.

विभागीय आयुक्त नागपूर यांना या कार्यक्रमासाठी वितरीत करण्यात आलेला निधी त्यांनी राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र खाते उघडून त्यामध्ये जमा करावा. जिल्हापरिषदांच्या मागणीनुसार जिल्हाधिकारी यांच्या मार्फत त्यांना निधी आहरित कपुन वाटप करावा. संपूर्ण निधी एकाचवेळी आहरित अथवा वितरीत करण्यात येऊ नये. तसेच जिल्हापरिषदांनी देखील या योजनेसाठी राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र खाते उघडून त्या मार्फत निधी वितरणाची कार्यवाही करावी.

(१.११) <u>अनुदान :-</u>

सिंचन विहीरी कार्यक्रमासाठी देय अनुदान जवाहर विहीरींसाठी देय असलेल्या अनुदाना प्रमाणे प्रति विहीर रुपये २.५० लक्षच्या कमाल मर्यादेत निश्चित करण्यात येत आहे. या कार्यक्रम अंतर्गत विहीर मंजूर केल्यावर लाभार्थ्याने विहिरीचे काम तात्काळ सुरु करावे. लाभार्थी जसजसे विहिरीचे काम पूर्ण करतील तसतसे संबंधित उप अभियंता /शाखा अभियंता यांनी विहिरीचे झालेल्या कामाचे मोजमाप घेऊन संबंधित लाभार्थ्यास देय असलेले अनुदान त्याच्या बँक खात्यावर जमा करण्याची कार्यवाही करावी.

(१.१२) <u>वेबसाईट:-</u>

सिंचन विहीर प्रकरणी लाभार्थी निवडीची प्रक्रिया पारदर्शक असावी म्हणून या योजनेसाठी http://aaplesarkar.maharashtra.gov.in ही वेबसाईट उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या वेबसाईट वर लाभार्थ्याचे नाव, त्याने केलेल्या अर्जाचा दिनांक, त्याची वैयक्तिक माहिती, समितीने निवडलेल्या लाभार्थ्यांची यादी, प्रशासकीय मान्यता, कार्यारंभ आदेश, काम पूर्ण केल्याचा दिनांक, निधी वितरीत केल्याची माहिती. इत्यादी उपलब्ध करुन द्यावी. सदर माहिती संबंधित उप अभियंता (छोपावी/लपा/पाणी पुरवठा) यांनी पंचायत समिति स्तरावर वरिष्ठ सहाय्यका मार्फत व कार्यकारी अभियंता (लपा/पाणीपुरवठा) यांनी जिल्हा परिषद स्तरावर भरण्याची कार्यवाही करावी.

(१.१३) <u>तपासणी:-</u>

विहिरींच्या कामाची गुणवत्ता कायम राहावी यासाठी विभागाच्या मापदंडानुसार वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक आहे. केवळ पूर्ण झालेल्या विहिरींची तपासणी करण्याबरोबर काम चालू असताना प्राथमिक अवस्थेतील कामांनाही भेटी देऊन संबंधित शाखा अभियंता/उप अभियंता यांनी तपासणी व मार्गदर्शन करावे.

(१.१४) <u>त्रयस्त संस्थेमार्फत विहिरींच्या कामाची भौतिक तपासणी व मूल्यमापन:-</u>

जिल्हास्तरीय समितीने विहिरीच्या झालेल्या कामाचे मूल्यमापन यशदा, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये, (उन्नत महाराष्ट्र अभियान अतर्गत शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक-३६११/(५६/१५) / तांशि-२ दिनांक १३ जानेवारी, २०१६ या शासन निर्णयाप्रमाणे) शासकीय तंत्र निकेतन व शासकीय कृषी महाविद्यालय, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी या संस्थेमार्फत करण्यात यावे. सदरचा खर्च आस्थापना खर्चातून भागविण्यात यावा. राज्य स्तरावरील होणारा खर्च विभागीय आयुक्त स्तरावरील आस्थापना विषयक १% तरतुदी मधून करण्यात यावा.

सदर विहिरींसाठी होणारा खर्च मागणी क्रमांक-सी-९,४२५०, इतर सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च, या योजनेत्तर योजनेखालील विहिरी तयार करणे याखाली, मदत व पुनर्वसन विभागाकडून दुष्काळ प्रतिबंधक उपाययोजनेंतर्गत सन २०१६-१७ या वर्षाच्या मंजूर अनुदानातून करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०९१२१३५५२६२५१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Purushottam N Bhapkar

Digitally signed by Purushottam N Bhapkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e9878980bd80d5b35fe3e1f682b8222bb14a9c71cd698e9baa37a653df532555, cn=Purushottam N Bhapkar
Date: 2016.10.06 14:16:44 +05'30'

**( डॉ. पुरूषोत्तम भापकर )**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा .राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा. मंत्री (रोहयो), यांचे खाजगी सचिव,
४. सर्व मा.मंत्री, / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मा.समिती प्रमुख, महाराष्ट्र विधानमंडळ रोहयो समिती, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मुख्य सचिव यांचे सहसचिव,
७. सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग
८. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
९. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१०. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे
११. जिल्हाधिकारी, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर,
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर,
१३. विभागीय कृषि सहसंचालक, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर,
१४. अधीक्षक अभियंता, पाटबंधारे/अधीक्षक अभियंता,लघु पाटबंधारे, (स्थानिक स्तर), गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर,
१५. संचालक,अर्थ व सांख्यिकी संचालनालय /महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई, (प्रसिध्दीकरीता)
१६. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर,
१७. उपायुक्त (विकास), गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर,
१८. महालेखापाल, (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर,
१९. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर
२०. जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर,
२१. सर्व उपसचिव/ अवर सचिव व कार्यासन अधिकारी, रोहयो
२२. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
२३. निवडनस्ती रोहयो-५.

**शासन निर्णय क्र. विहीर-२०१६/प्र.क्र. ३१/रोहयो-५, दिनांक ११ सप्टेंबर, २०१६ सोबतचे**

**परिशिष्ट "अ"**

सिंचन विहिरींचे ५०,०००/- पर्यंतचे काम लाभार्थ्यांने पूर्ण केल्यावर म्हणजेच २०% काम पूर्ण झाल्यावर त्यास झालेल्या कामाचे अनुदान अदा करण्यात यावे. याप्रमाणे लाभार्थ्यास प्रत्येक २०% काम पूर्ण झाल्यावर एकदा याप्रमाणे एकूण ५ टप्प्यात अनुदान अदा करण्यात यावे. लाभार्थ्याने लेखी मागणी केल्याशिवाय ५ पेक्षा कमी टप्प्यात अनुदान अदा करण्यात येऊ नये.

***************